# Press Covarage

## Maharashtra Times, Pune. Dated 9th January 2016



# समुपदेशनाने मिळाले 'पंख'

म. टा. प्रतिनिधी, पुणे

'घरी आमच्याशी कोणी निवांत गप्पा मारत नाही, त्यामुळे एकटेपणा जाणवतो.. वर्गातल्या मुलींकडे आम्ही चांगल्या नजरेने बघत नव्हतो. पण जीवनमूल्य शिक्षण आणि वेळोवेळी मिळालेल्या समुपदेशनामुळे मानसिकता बदलली, प्रेम आणि आकर्षण यातील फरक उमगला...' अशी प्रांजळ कबुली देत शालेय विद्यार्थ्यांनी शुक्रवारी त्यांच्या मनात लपलेली अनेक गुपिते उलगडली.

निमित्त होते पंख संस्थेतर्फे आयोजित केलेल्या महापालिकेच्या शाळेतील विद्यार्थी आणि पालकांच्या स्नेहसंमेलनाचे. पंख संस्था आणि क्विक हिल फाउंडेशनतर्फे महापालिकेच्या २५ शाळांमध्ये राबविण्यात येणाऱ्या जीवनमूल्य शिक्षण प्रकल्पाचा आढावा घेण्यासाठी हा कार्यक्रम घेण्यात आला. या वेळी सहय्यक शिक्षण अधिकारी मीनाक्षी राऊत, क्विक हिलचे अजय शिर्के, वैजयंती ठकार, विविध शाळांचे मुख्याध्यापक उपस्थित होते.




समुपदेशन प्रकल्पातंर्गत सुरू असणारे व्याख्यान.

### २५ शाळांमध्ये जीवनमूल्य प्रकल्प

'मुलांना त्यांच्या क्षमता, सवयी, ध्येय कसे गाठावे, मैत्री कशी असावी, वयानुसार होणारे शारीरिक आणि मानसिक बदल अशा विविध संवदेनशील मुद्द्यांविषयी किशोरवयीन मुलांमध्ये अनेक शंका असतात. योग्य वयात मार्गदर्शन न मिळाल्यास, विचाराची दिशा भरकटून चुकीची पावले पडतात. हे टाळण्यासाठी आम्ही पाच वर्षांपासून महापालिकेच्या २५ शाळांमध्ये जीवनमूल्य शिक्षण प्रकल्प राबवित आहोत. या समुपदेशनादरम्यान मुले मोकळेपणाने संवाद साधत आहेत. अनेकांना त्यांच्या वर्तनातील चुकाही उलगडल्या असून, त्या चुका ते बोलून दाखवत आहेत. काही विद्यार्थ्यांना आम्ही त्यांच्यामध्ये लपलेल्या सुप्त कलागुणांची जाणीव करून दिली आहे, तर काही मुले व्यसनाधीनतेतून बाहेर पडण्याचा प्रयत्न करीत आहेत,' अशी माहिती स्मिता आपटे यांनी दिली.

'घरच्या बिकट परिस्थितीमुळे आमच्या घरी मुलांबरोबर गप्पा मारायला कोणाला वेळच नसतो. यामुळे येणाऱ्या एकटेपणातून आम्ही व्यसनाधीनतेकडे वळत आहोत. आम्हाला यातून बाहेर पडायची इच्छा आहे,' असे मत काही मुलांनी व्यक्त केले. वर्गातील मुलींकडे बघण्याचा पूर्वी आमचा दृष्टिकोन चांगला नव्हता. पण लैंगिक शिक्षणाचे धडे मिळाल्यावर दुसऱ्याच्या शरीराचा आदर राखण्याचा धडा मिळाला. प्रेम




आणि आकर्षण यातील फरक कळाल्याने मनातील अनेक शंका दूर झाल्या, अशी प्रांजळी कुबली काही मुलांनी दिली. जीवनमूल्य शिक्षण प्रकल्पातील समुपदेशनातून अंगभूत असणाऱ्या कलागुणांना वाव मिळाल्याचेही काही विद्यार्थ्यांनी सांगितले.

जीवनमूल्य शिक्षण ही काळाची गरज असून, या उपक्रमाला व्यापक स्वरूप देण्यासाठी आवश्यक असलेली सर्व प्रकारची मदत करण्याचे आश्वासन राऊत यांनी दिले. शालेय विद्यार्थ्यांबरोबरच पालकांनाही लैंगिक शिक्षणासंदर्भात मुलांशी संवाद कसा साधवा, याचे प्रशिक्षण देण्याची गरज आहे. त्यामुळे संस्थेने पालकांसाठी कार्यशाळा घ्याव्यात, अशी सूचना त्यांनी केली. शिर्के यांनी क्विक हिल संस्थेतर्फे या पुढील काळातही सहकार्य करण्याची तयारी दर्शविली. पंखच्या अध्यक्षा स्मिता आपटे यांनी जीवनमूल्य शिक्षण प्रकल्पाची गेल्या पाच वर्षांची माहिती दिली.